| MHLA120011822023 | **निशाणी क्रमांक १० वरील आदेश**<br>**(घोषीत दिनांक २५/०९/२०२५)** |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज कोर्ट कमिशनर नियुक्त करणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. वादी पुढे असे कथन करतात की, त्यांची मौजे केळगाव, ता. निलंगा येथील सर्वे नंबर १८६ मध्ये १ हेक्टर ७८ आर जमीन असून तसेच प्रतिवादी क्र.१ यांची देखील त्याच सर्वे नंबरमध्ये ३ हे. ३५ आर जमीन आहे. सदर वादीच्या जमिनीमध्ये व प्रतिवादीच्या जमिनीमध्ये पुर्व बाजूने दक्षिण–उत्तर बांध असून सदर बांधाबाबत त्यांच्यामध्ये वाद आहे. वादीने सदर मिळकतीची मोजणी करुन हद्दी खुणा कायम करण्याची उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांना विनंती केली असता मा. न्यायालयाच्या आदेशाशिवाय मोजणी करण्यास नकार दिला. त्यामुळे तालुका निरीक्षक भुमि अभिलेख, निलंगा यांना ७/१२ वरील क्षेत्राप्रमाणे संयुक्त मोजणी करुन हद्दी खुणा कायम करण्यासाठी कोर्ट कमिशनर भुमि अभिलेख, निलंगा यांना आदेश देण्यात यावे अशी ते विनंती करतात.

०३. प्रतिवादी यांच्याविरुध्द एकतर्फा सुरू ठेवण्यात आलेला असल्यामुळे त्यांनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

०४. वादीतर्फे विधीज्ञ श्री. के.व्ही. पंढरीकर यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. प्रस्तुतचा दावा विवाद जमिनीची मोजणी करुन हद्दी खुणा कायम करुन कायमचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या व प्रतिवादीच्या जमिनीमध्ये बांधाबाबत त्यांच्यामध्ये वाद आहे. दावा जागा ही निर्विवादपणे स्थावर मालमत्ता असून, शासकीय करपात्र आहे. दावा हा

स्थावर मालमत्तेशी निगडीत असल्यामुळे, तसेच जमिनीच्या मालमत्तेच्या नोंदी भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे ठेवल्या जातात. त्यामुळे जमिनीच्या मालमत्तेचे अचुक स्थान व ओळख जाणुन घेण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय यांचे संबंधित अधिकारी हे तज्ञ व्यक्ती आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात भविष्यात पुन्हा वाद निर्माण होऊ नयेत याकरीता मोजणी करण्याचे आदेश उपअधिक्षक भुमि अभिलेख, निलंगा यांना देणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरीता व दाव्याची क्लीष्ठता व संख्या न वाढवण्याकरीता उचित वाटते. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे असे मत नोंदवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | उप अधिक्षक, भूमी अभिलेख, निलंगा यांनी मौजे केळगाव, ता.निलंगा येथील सर्वे नंबर १८६ मधील वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची संयुक्त मोजणी करुन हद्दीखुणा कायम करुन तसा अहवाल सदर कोर्टात सादर करणेचा आहे. |
| ३. | उपअधिक्षक भूमी अभिलेख यांना निर्देशित करण्यात येते की त्यांनी हद्दीखुणा कायम करण्यापूर्वी दोन्ही पक्षकारांना माहिती देणेची आहे. |
| ४. | वादीनी सदर मोजणीकरीता लागणारी फी व कागदपत्रे देण्याची आहेत. |
| ५. | रिट कमिशन पाठविण्यात यावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.09.25 17:12:39 +0530

निलंगा
दि. २५/०९/२०२५

( श्रीमती. के. पी. गाडे )
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर
निलंगा, जि.लातूर